Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 16 May 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १६ मे २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला सहाय्य केल्यानंतर भारत आणि तुर्कीचे संबंध बिघडले आहेत. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ तसंच हैदराबाद इथल्या मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठानं तुर्की संस्थांसोबतचे त्यांचे शैक्षणिक सामंजस्य करार रद्द केले आहेत. यापूर्वी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ–जेएनयूनंही तुर्कीतील इनोनू विद्यापीठासोबतचा सामंजस्य करार रद्द केला होता.

****

ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. आज नागपूर जिल्ह्यातल्या कामठी शहरात तिरंगा यात्रा काढण्यात आली. तत्पुर्वी राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्य चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मानवंदना देत या यात्रेचा शुभारंभ केला. यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात माजी सैनिक तसंच नागरिकांनी सहभाग घेतला.

****

पंजाब नॅशनल बँक घोटाळ्याप्रकरणी फरार आणि इंग्लंडच्या तुरुंगात असलेला हिरे व्यापारी नीरव मोदी याचा जामीन अर्ज लंडनच्या उच्च न्यायालयानं फेटाळला आहे. नीरव मोदीनं काल गुरुवारी लंडनच्या न्यायालयात त्याच्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवर निर्णय होईपर्यंत जामिनावर सुटका करण्यासाठी अर्ज केला होता, अशी माहीती केंद्रीय अन्वेषण विभागाच्या निवेदनात दिली आहे.

****

ठिकठिकाणी पडत असलेला पाऊस आणि आगामी पावसाळ्याच्या धर्तीवर डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभागानं उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. डेंग्यूची लक्षणं दिसल्यास निष्काळजी करु नये, ताबडतोब रक्त तपासणी करुन

डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नियुक्त सरकारी रुग्णालयांमध्ये डेंग्यूची चाचणी मोफत उपलब्ध असल्याचं केंद्रीय आरोग्य विभागानं म्हटलं आहे. ताप असताना विश्रांती घ्यावी आणि भरपूर द्रवपदार्थांचं सेवन करावं, सतर्कता आणि सुरक्षितता बाळगावी असंही आरोग्य विभागाच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात वाशी तालुक्यात अवैधरित्या खताचा साठा करून ठेवल्याप्रकरणी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी काल टाकलेल्या छाप्यात २० मेट्रिक टन रासायनिक खत जप्त केलं आहे. एका शेतकऱ्याच्या कुक्कुटपालन शेडमध्ये ४ लाख ६१ हजार रुपयांचा हा साठा ठेवण्यात आला होता. या प्रकरणी संबंधिताविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. खरीप पेरणीच्या तोंडावर जिल्ह्यात कृषी विभागाच्या भरारी पथकानं अवैधरित्या केलेला खतसाठा शोधण्याची मोहीम हाती घेतली आहे.

****

केंद्रीय कायदा राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या वेरूळ इथंल्या श्री घृष्णेश्वर मंदिरात घृष्णेश्वराचं दर्शन घेत अभिषेक केला. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, खासदार भागवत कराड यावेळी उपस्थित होते. देवस्थान ट्रस्टच्या वतीनं अध्यक्ष योगेश टोपरे यांनी मेघवाल यांना शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आज छत्रपती संभाजीनगर इथं हल्लाबोल महामोर्चा काढण्यात येणार आहे. आज सायंकाळी साडेचार वाजता क्रांती चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चास सुरुवात होईल, अशी माहीती विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

****

जालना तहसील कार्यालयातल्या महसूल सहायकाविरुद्ध पाच लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. राजेश श्रीपतराव शिंदे असं लाच मागणाऱ्या महसूल सहायकाचं नाव आहे. जिल्ह्यातल्या वर्ग एकच्या जमिनीचं वर्ग दोनमध्ये रूपांतर करण्यासाठी दाखल दाव्याचा निकाल तक्रारदाराच्या बाजूनं देण्यासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

बहुप्रतिक्षित लातूर जिल्हा रुग्णालयाच्या जागेचा विषय आता मार्गी लागला आहे. या जागेच्या मोबदल्यासाठी आरोग्य विभागाला प्राप्त झालेला ३ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कृषी विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे कृषी विभागाची जागा आरोग्य विभागाला हस्तांतरित होण्याचा मार्ग मोकळा झाला असून लातूर इथं १०० खाटांचं जिल्हा रुग्णालय उभं राहणार आहे. वर्ष २०१३ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती, मात्र जागेचा प्रश्न प्रलंबित होता.

****

भंडारा जिल्ह्यात धान खरेदी केंद्रावर बंदी असलेल्या प्लॅस्टिक बारदान्याचा वापर केल्याप्रकरणी पणन विभागानं १३ धान खरेदी केंद्रांवर दंडात्मक कारवाई केली आहे. शासनानं पुरवठा केलेल्या बारदान्यात धान खरेदी करणं बंधनकारक असतांना बहुतांश केंद्र चालकांनी शासनाच्या नियमांचं उल्लंघन करत प्लॅस्टिक बारदान्यात खरेदी केली, त्यामुळं पणन विभागाने करवाई केली आहे.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयनं २८ जून ते २२ जुलै दरम्यान होणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या इंग्लंड दौऱ्यासाठी संघांची घोषणा केली आहे. या दौऱ्यात पाच टी–२० सामने आणि त्यानंतर तीन एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळले जातील. या दौऱ्यात भारतीय संघाचं नैतृत्व हरमनप्रीत कौर करणार आहे. दरम्यान, भारताचा दोनवेळा ऑलिंपिक पदक विजेता आणि भालाफेकीतील जागतिक विजेता नीरज चोप्रा आज कतारमधील दोहा इथं होणाऱ्या डायमंड लीग स्पर्धेत भाग घेणार आहे.

****